
साप्ताहिक
चतुरस्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष
# चपराक
• वर्ष : १८
• अंक : १९
• पाने : ८
पुणे
मूल्य ६/-
www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

'Industrial Efficiency Award' Winner
■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants
For More Details Contact
INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.

Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.
WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111. Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.
Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in

■ सोमवार, दि. ०६ ते १२ जुलै २०२६
संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले
RNI No. MAHMAR/2011/35979

# रामो विग्रहवान धर्मः

**गुरूवर्य प्राचार्य डॉ. राम शेवाळकर सांगायचे, ''रामाचा आदर्श ठेवायचा तो सत्यवचनासाठी; बायकोच्या त्यागासाठी नव्हे!'' गेल्या काही वर्षात बायकोचा त्याग करणारेच रामनामाचा महिमा सांगत आहेत आणि राम मंदिराच्या उभारणीचे राजकारण करत आहेत. अयोध्येत प्रभू श्रीरामचंद्राचे मंदिर व्हावे, अशी हिंदुस्थानातील समस्त नागरिकांची इच्छा होती. ती इच्छा फळालाही आली. कित्येक वर्षांपासूनचे देशवासीयांचे स्वप्न पूर्ण झाले. राजकीय इच्छाशक्तिचा अभाव, स्वार्थ आणि धार्मिक राजकारण यामुळे अडकलेले काम पूर्णत्वास गेल्याने अनेकांच्या मनात सत्ताधारी पक्षाविषयी कमालीचा उमाळा दाटून आला होता. यात बहुतेकांनी जमेल तसा खारीचा वाटा उचलला. श्रीराम मंदिराच्या निर्माणात आपला एक रुपया तरी असावा, या श्रद्धेतून ज्याला जसे जमेल त्याने तसा हातभार लावला मात्र रामभक्तांच्या या भावनांचाही बाजार मांडून तिथे सुद्धा भ्रष्टाचार झाल्याचे समोर येत आहे.**



संपादकीय
घनश्याम पाटील
७०५७२९२०९२

शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी शिवसेनेच्या वतीने राम मंदिरासाठी दिलेली रक्कम आणि चांदी याची अजून साधी पावतीही मिळाली नसल्याचे सांगितले. अजूनही त्याबाबत संबंधितांचा खुलासा आला नाही. अनेकांच्या बाबतीत हेच घडले आहे. त्यांनी मोठ्या कष्टाने, नेटाने आणि प्रामाणिक भावनेतून दिलेला पैसा मंदिराच्या नावावर कोणी हडप केला हे सर्वश्रुत आहे. याबाबत झुंड इतकी की कोणी जाब विचारलाच तर त्यांना थेट राष्ट्रद्रोही ठरवण्यापर्यंत यांची मजल जात आहे.

उत्तर प्रदेशचे माजी आमदार पवन पांडे यांच्या आरोपानंतर मंदिर ट्रस्टच्या तक्रारीवरून एफआरआय दाखल करण्यात आला. विश्वासघात, फसवणूक, बनावटगिरी, कट रचणे अशी कलमे त्यात घालण्यात आली. दानपेटीतून रोख रक्कम गायब होणे, भाविकांनी अत्यंत श्रद्धेने दिलेले सोने-चांदी, हिरे बदलून तिथे खोटे दागिने ठेवणे असे काही आरोप त्यात आहेत. हा 'भाविकांच्या श्रद्धेशी खेळ' आणि 'संघटित लूट' असल्याचे विरोधी पक्षांनी म्हटले आहे तर अनाठायी आरोप करून रामाला बदनाम करायचा प्रयत्न असल्याचे हिंदुत्ववाद्यांचे म्हणणे आहे. हे प्रकरण आता एसआयटीकडे गेले असून, मंदिर ट्रस्टचे महासचिव चंपत राय आणि विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांनी राजीनामा दिला आहे. अयोध्या येथील राम मंदिरातील नैवेद्याच्या चोरीचा अहवाल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना पाठवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. भागवतांकडे तो अहवाल पोहोचल्यानंतर काही मोठे निर्णय घेतले जातील, असे सांगण्यात येत आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत रामललाची प्राणप्रतिष्ठापणा झाली. त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की, 'राम हे वाद नाहीत; तर समाधान आहेत.' त्यानंतर जगभरातील कोट्यवधी रामभक्तांनी पैसा, सोने, चांदी, दागिने, अन्य मौल्यवान वस्तू मोठ्या विश्वासाने आणि अत्यंत श्रद्धायुक्त अंतःकरणाने अर्पण केल्या. देशात सर्वाधिक देणग्या मिळवणाऱ्या मंदिराच्या दृष्टिने अयोध्येच्या रामाचा प्रवास सुरू झाला! मात्र 'राम वाद नाहीत' असे सांगणाऱ्या पंतप्रधानांच्याच कारकिर्दीत आणि मंदिर उभारणीच्या केवळ अडीच वर्षात इथल्या भ्रष्टाचाराच्या बातम्या येणे आणि मंदिर प्रशासन वादात सापडणे हे अत्यंत दुर्दैवी आणि दुःखद आहे. मंदिरात जाऊन तिथल्या दानपेटीत पैसे टाकणारा भाविक ना कोणती पावती मागतो, ना त्याने दिलेल्या पैशाचा सुयोग्य विनियोग व्हावा म्हणून कोणाशी करार करतो! त्याची श्रद्धा फक्त रामावर असते आणि त्यामुळे तो स्वेच्छेने दान करतो. त्याच्या या भावनांचा अव्हेर केला गेल्याने समस्त हिंदू समाज अस्वस्थ आहे. रामाच्या नावावरच राजकारण करणारे आणि त्या जोरावरच सत्तेत असणारे यांच्यासाठी तर ही अत्यंत लाजीरवाणी बाब असून यातील जे कोणी आरोपी असतील त्यांना कठोर शिक्षा दिली जावी, अशी सामान्यांची भावना आहे. आर्थिक फसवणूक झाली तर ती भरून काढता येते पण अशी भावनिक फसवणूक झाली तर त्या जखमा दीर्घकाळ भळभळत राहतात.

''पिढ्या न पिढ्यांच्या संघर्षामुळे आणि लाखो रामभक्तांच्या समर्पण, त्याग व भक्तीमुळे बांधलेले हे भव्य मंदिर संपूर्ण हिंदू समाजासाठी आदर, श्रद्धा आणि भक्तीचे केंद्र बनले आहे. रामलला मंदिरातील दानपेट्यांमध्ये जमा केलेल्या निधीची चोरी ही दुर्दैवी घटना आहे. त्यामुळे संपूर्ण समाजाच्या आणि आरएसएससह रामभक्तांच्या भावना आणि श्रद्धा दुखावल्या गेल्या आहेत,'' असे संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांनी म्हटले आहे. 'देशातील सर्वात मोठी चोरी' म्हणून विरोधकांकडून सतत आरोप होत असताना देखील एकाही महत्त्वाच्या नेत्याची, पदाधिकाऱ्याची सखोल चौकशी झाली नाही. त्यामुळे संघाची भूमिकाही वरवरची आणि कुणाला तरी पाठिशी घालणारी दिसते.

देशातील सनातन श्रद्धेशी खेळणारे कोण आहेत, याचा तपास करण्याऐवजी 'राम मंदिर उभारणी कार्यात अडथळे आणणाऱ्या समाजवादी पक्षाला याबाबत बोलण्याचा अधिकार नाही,' असे सांगितले जात आहे. ज्या प्रभू श्रीरामांनी एका धोब्याच्या संशयावरून सीतामाईंची अग्निपरीक्षा घेतली त्याच रामाच्या मंदिरात गैरव्यवहार झाल्याचे गंभीर आरोप होत आहेत आणि हे तथाकथित रामभक्त 'त्यांना बोलण्याचा अधिकार नाही' असे निर्लज्जपणे सांगत आहेत. गोविंददेव गिरी अर्थात पूर्वीचे आचार्य किशोर व्यास हे या राममंदिराचे कोषाध्यक्ष आहेत. मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापनेच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना चमच्याने तीर्थ भरवतानाचे त्यांचे छायाचित्र प्रसिद्ध झाले होते. ही जबाबदारी स्वीकारत त्यांनी त्यांचा कोषाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी होत आहे. या प्रकाराने दुःखी आणि लज्जीत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. ते म्हणाले, ''ट्रस्टचे सर्व व्यवहार चेकने होतात. मी पुण्यात वास्तव्यास असतो. कथा-प्रवचनांसाठी देशभर फिरावे लागते. त्यामुळे महिन्या-दीड महिन्यांत एकदा अयोध्येला जाणे होते. दानपेटीत येणारे पैसे आणि त्याची मोजणी याच्याशी माझा संबंध येत नाही. माझ्या प्रवासासाठी सुद्धा मी न्यासाकडून एक रुपयाही घेतला नाही.'' या देणगी गैरव्यवहार आणि दानचोरीच्या प्रकरणात उद्धव ठाकरे यांनी आक्रमक भूमिका 'घेत रामरक्षा आंदोलन' सुरू केले आहे. मंदिरातील दानपेटीतील पैशांची चोरी करून तो पैसा राजकीय पक्ष फोडण्यात आणि त्यांच्यात फूट पाडण्यात वापरला असल्याचा थेट आरोप त्यांनी केलाय. लालकृष्ण अडवाणी यांनी 'आता हिंदू मार खाणार नाहीत,' असे विधान केले होते. तोच धागा पकडत 'आता हिंदू माफ करणार नाहीत,' असे उद्धव यांनी बजावले आहे. राज्यभर हनुमान मंदिरात जाऊन आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिलाय. त्यांच्या आंदोलनात त्यांना पुस्तक हातात धरूनही रामरक्षास्त्रोत म्हणता न आल्याचा आरोप केला जातोय. 'उद्धव ठाकरे यांनी आधीच रामाचे नाव घेतले असते तर त्यांची अशी वाताहत झाली नसती. उशीरा का होईना पण त्यांनी रोज रामरक्षा म्हणावी,' असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मारलाय. मुख्य विषयांपासून भरकटत विरोधकांवर काही तरी आरोप करायचे आणि यातील भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष करायचे, असे सत्ताधाऱ्यांचे धोरण दिसत आहे.

प्रभू श्रीरामांना 'मर्यादापुरूषोत्तम' म्हटले जाते. याच 'मर्यादां'चा सर्वांना विसर पडतोय. 'रामो विग्रहवान धर्मः' म्हणजेच 'राम म्हणजेच मूर्तिमंत धर्म', अशी शिकवण आपण विसरलो आणि धार्मिक राजकारणात अडकलो. वैयक्तिक सुखापेक्षा कर्तव्य मोठे मानणारे, बंधुप्रेम, एकपत्नीव्रत जपणारे, कसलाही भेदभाव न करणारे, सत्यवचनी, कुटुंबप्रेमी आणि त्यागाचे प्रतीक असणारे श्रीराम आपले सर्वांचे आदर्श आहेत. त्यांचे मंदिर झाल्याने किंवा न झाल्याने आपल्या जीवनात काहीच फरक पडणार नाही. त्यांचा एखादा गुण जरी आपल्याला कळला तर मात्र फार मोठे परिवर्तन घडणार आहे.

इतिहासात युगपुरूष राजे दोनच! एक प्रभू श्रीराम आणि दुसरे छत्रपती शिवाजी महाराज. आपले दुर्दैव हे की या दोघांच्याच नावाने इथले राजकारण होते. सामान्य माणसाला त्यावरून वेठीस धरले जाते. या दोघांचा आदर्श घेण्याऐवजी त्यांच्यावरून नेहमी वाद कसे निर्माण होतील हेच आपल्या राजकारण्यांकडून बघितले जाते. मग ते विषय श्रद्धेचे, अस्मितेचे होतात. त्यावरून वादंग निर्माण होते. त्यांच्यावरून सत्ता येते. आंदोलने होतात. सत्तेवरून पायउतारही व्हावे लागते. श्रीराम आणि छत्रपती शिवाजी हे फक्त शब्द नाहीत तर समाजमनासाठीचे मंत्र आहेत. ही नावे उच्चारली तरी भारावून जाणारा मोठा वर्ग आहे. त्या सगळ्यांच्या भावनांचा बाजार मांडण्याचे काम काही नतद्रष्ट मंडळी करतात. तो थांबला पाहिजे. सामान्य माणसानेही याला बळी पडू नये.

तुळशीदास म्हणतात,

**''दैहिक दैविक भौतिक तापा। राम राज नहि काहुहि व्यापा ।।''**

म्हणजे ''रामराज्यात कोणालाही शारीरिक, दैवी, भौतिक त्रास नव्हता. तिथे न्याय, शांती समृद्धी होती.'' खुद्द रामरायाच्याच नावाने राजकारण करणाऱ्यांना अद्दल घडावी आणि अशीच समृद्धी आपल्या वाट्याला यावी, इतकीच यानिमित्ताने प्रार्थना! ■■

**मंडळी 'राजकारण' ह्या विषयावर मला फारसे कधी लिहावेसे वाटलेच नाही. त्याचे कारण त्यावर का लिहावे आणि कशासाठी लिहावे, असा एक प्रांजळ प्रश्न माझ्या मनाला सतत पडतो आणि मग मी थोडासा निराश होतो. 'राजकारण गेलं चुलीत', अशी एक प्रचलित म्हण जी मी माझ्या लहानपणापासून ऐकत आलो आहे ती आठवते परंतु अजूनपर्यंत मला ती 'चूल' काही केल्या सापडलीच नाही आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते जे काही 'राजकारण' असते ते काही केल्या मला अजून तरी समजले नाही अथवा माझीच काय पण सर्वसामान्य माणसांची ते समजण्याची कुवतच नसावी बहुधा!**

# राम का ना बदनाम ना करो



रवींद्र कामठे
पुणे
९४२१२ १८५२८

देवानंद यांनी १९७१ मध्ये'हरे राम हरे कृष्ण' हा चित्रपट काढला होता. त्यात त्यांनी पाश्चात्य हिप्पी संस्कृतीच्या विळख्यात अडकलेल्या त्यावेळेसच्या तरुण पिढीचे अत्यंत विदारक चित्र समाजासमोर ठेवले होते. राम आणि कृष्ण ह्या आपल्या धार्मिक अस्मितेशी आणि भारतीय संस्कृतीशी पाश्चिमात्य देशात आणि त्याच्याच धरतीवर भारतातही कसा चरसी, गंजाडी, निरुद्योगी आणि विकृत लोकांचा सुळसुळाट झाला होता, हे दाखवून त्या विकृत प्रवृत्तीपासून त्याकाळच्या तरुणाईला त्यामागचे एक षड्यंत्र दाखवून समाजप्रबोधन करण्याचा खूप चांगला प्रयोग ह्या चित्रपटाद्वारे करण्यात आला होता.

पूर्वी असे समाजप्रबोधन करणारे चित्रपट बनत असत. आजकाल समाजप्रबोधनाच्या नावाखाली समाजविघातक आणि धार्मिक तेढ वाढवणारे चित्रपट जास्त प्रमाणात निर्माण केले जातात आणि त्याच्यात काही विशिष्ट प्रवृत्तींचे, वर्गांचे आणि धर्मांचे प्रचारक राजकारण अतिशय सोयीस्करपणे साधण्याचा प्रयत्न केला जातो हेही निर्विवाद सत्य आहे.

ह्याच चित्रपटातील आनंद बक्षी यांनी लिहिलेले आणि आरडीने संगीतबद्ध केलेले व किशोर कुमार यांनी गायलेले एक गीत, सध्याच्या राजकीय, सामाजिक, वैचारिक, भावनिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परिस्थितीशी, ५६ वर्षांनंतरही साम्य दर्शवणारे चित्र पाहून, जो कोणी खरा 'भारत'प्रेमी असेल त्याची मान आपसूकच शरमेने खाली गेल्याशिवाय राहणार नाही, हे मात्र शंभर टक्के सत्य आहे. (प्रातिनिधिक स्वरूपात हे गीत खाली देत आहे.)

**देखो ओ दीवानो, तुम ये काम ना करो**
**राम का नाम बदनाम ना करो, बदनाम ना करो**
**राम को समझो, कृष्ण को जानो, नींद से जागो ओ मस्तानो**
**जीत लो मन को पढ़ कर गीता**
**मन ही हारा तो क्या जीता, तो क्या जीता**
**हरे कृष्णा हरे राम!**
**जीवन को नशे का तुम गुलाम ना करो**
**राम का नाम बदनाम ना करो, बदनाम ना करो**
**राम ने हसकर सब सुख त्यागे, तुम सब दुख से डर के भागे**
**कृष्ण ने कर्म की रीत सिखाई**
**तुमने फ़र्ज़ से आँख चुराई, ओ राम दुहाई**
**हरे कृष्णा हरे राम**
**जीवन नाम है काम का, आराम ना करो**
**देखो ओ दीवानो, तुम ये काम ना करो**
**राम का नाम बदनाम ना करो, बदनाम ना करो**

अतिशय दुःखी अंतःकरणातून सांगावे लागते आहे की, त्या काळातल्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारे हे गीत आणि त्यामधील परिस्थितीचे केलेले वर्णन आजही इतके चपखलपणे बसले आहे की, आपण अजूनही गुलामगिरीच्या मानसिकतेमधून बाहेर पडलो नाही आणि पडायचा प्रयत्नही करत नाही आहोत. इंग्रजांनी १५० वर्षे आपल्यावर राज्य केले हा इतिहास इतका ताजा आहे की, आपण स्वातंत्र्य मिळवल्यानंतर ७५ वर्षे होऊन गेली तरी आपल्या गुलामी मानसिकतेवर मात करू शकलेलो नाही. दुर्दैवाने आज कुठलाच राजकीय पक्ष अथवा संघटना सर्वसामान्य जनतेला ह्या मानसिकतेमधून बाहेर पडू नये अशीच व्यवस्था करताना दिसत आहे. गेली काही वर्षे देशात अत्यंत अराजकतेचे वातावरण आहे. सुसंस्कृत, तत्त्वनिष्ठ, सदाचारी, देशभक्त, भ्रष्टाचारापासून चार हात दूर, संघटनात्मक शिस्त असलेला असा एक वेगळा पक्ष आणि त्याचे नेतृत्व, आपल्या राज्यघटनेच्या द्वारे निवडून देऊन आपण आपल्या समृद्ध आणि प्रगतशील विश्वगुरु भारताचे स्वप्न पाहिले होते. त्या स्वप्नाला गेल्या काही वर्षात सुरुंग लागून आपण कधी अधोगतीकडे वाटचाल करायला लागलो हे समजायला थोडा उशीरच झाला आहे असेच म्हणावेसे वाटते. त्याचे सर्वात ताजे उदाहरण म्हणजे अतिशय नियोजनपद्धतीने व निलाजरेपणे, भारतीय नागरिकाच्या ह्रदयी वसलेल्या प्रभू श्रीरामाच्या मंदिरातील दान पेटींवर घातला गेलेला डल्ला हे होय! आपल्याच देशाच्या अस्मितेवर, आपल्याच लोकांनी केवळ राजकीय स्वार्थापोटी घातलेला हा घाव कधीही भरून न येणारा असाच आहे असे अतिशय खेदाने नमूद करावेसे वाटते. सत्ताधारी पक्षाने गेल्या काही वर्षांमध्ये कितीही चांगली कामे केली असतील अथवा करत असतील (जो त्यांचा गैरसमज आहे) तरी सर्वसामान्य माणसांच्या भावनिक आणि श्रद्धेय अस्मितेवर घातलेल्या ह्या धाडीला, जनता कधीही माफ करणार नाही हेही तितकेच खरे आहे.

माझ्या ह्या भावना मी अतिशय पोटतिडकीने व्यक्त करतो आहे. राम जन्मभूमीमध्ये प्रभू श्रीरामाचे मंदिर निर्माण हा प्रत्येक भारतीय नागरिकाच्या दृष्टीने अतिशय अभिमानाचा, स्वाभिमानाचा आणि आपल्या सांस्कृतिक वैभवाचा विषय होता. अर्थात त्याचेही राजकारण करून त्याच्या जिवावर सत्ता काबिज झाल्यावर त्याच राममंदिराचा भ्रष्टाचाराने असाही अनादर करून आपण काय साध्य केले? हे ज्यांनी केले त्यांनाच ठाऊक! हेच का ते 'रामराज्य'? असा प्रश्न मनास पडल्याशिवाय राहत नाही. मी कुठल्याही राजकीय अभिनिवेषापोटी लिहित नसून, ह्या एका घटनेने माझ्या मनाला झालेल्या वेदना व्यक्त करण्याचा माझा एक छोटासा प्रयत्न करतो आहे.

देश प्रेम आणि देशाप्रतीची निष्ठा आता इतकी स्वस्त झाली आहे की, प्रत्येक गोष्टीचे राजकारण करून आपण आपल्या देशाची, जगातील एक प्रगतशील व सुसंस्कृत राष्ट्राची प्रतिमा डागाळण्याचे काम मात्र दुप्पट वेगाने करतो आहोत, असे खेदाने म्हणावे लागते आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा, छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाचा नुसता जयघोष करून, त्यांच्या जयंती आणि पुण्यतिथी ज्या विकृत पद्धतीने साजऱ्या करतो, त्यावरूनच आपल्याला शिवरायांच्या स्वराज्याची आणि शंभुराजांच्या बलिदानाचे मूल्यमापन अजूनही करताच आलेले नाही हे उमगते. त्यासाठी लागणाऱ्या राजकीय, सामाजिक आणि वैचारिक बुद्धिचा आणि इच्छाशक्तिचा अभाव हेच एकमेव कारण असू शकते.

शिवरायांच्या राज्यात शेतकऱ्याच्या भाजीच्या देठाला सुद्धा हात लावला जात नव्हता. त्या देशात आज राजरोसपणे शेतकरी, सर्वसामान्य जनता, तसेच मंदिरांच्या दानपेट्याही लुटल्या जात आहेत, ही शोकांतिका आहे.

शिवरायांच्या काळात शत्रूच्या आया बहिणींचीही अब्रू शाबूत राहत होती. तिच्या केसालाही धक्का लागू दिला जात नव्हता आणि असा गुन्हा घडलाच तर त्याचा चौरंगा करून त्याला आयुष्यभर खितपत ठेवले जात होते. असा दरारा आज कुठे पाहायला मिळतच नाही. राजरोसपणे चिमरुड्या मुलींवर अत्याचार होत आहेत. भोंदुगिरीचा तर नुसता सुळसुळाट झाला आहे. गुन्हेगारीला राजाश्रय मिळतो आहे. अंमली पदार्थांची दिवसाढवळ्या तस्करी होते आणि आणि त्यात आपली तरुण पिढी नष्ट होत चालली आहे. रोजगार निर्मिती ठप्प आहे आणि अर्थकारण तर बेभरवशाचे झाले आहे.

ह्या सगळ्यामुळे राजकीय अस्थिरता तर इतक्या प्रकर्षाने जाणवत आहे की, आपले राज्यकर्ते सध्याच्या काळात तासभरही सुखाने झोपू शकत असतील की नाही ह्याबाबत माझ्या मनात तरी शंका आहे.

सत्तेच्या हव्यासापाई कायदे आणि नीतीमूल्ये तर पायदळी तुडवून, कधीच वेशीला टांगून ठेवली गेली आहेत. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात आहे हे त्यांचे त्यांनाच कळत नाही. त्यात आपली समाजमाध्यमे आणि वृत्तपत्रे त्यांची जी काही सामाजिक, नैतिक जबाबदारी आहे, ती विसरून ते ही सत्ताधारांच्या तालावर नाचून आपले उखळ पांढरे करून घेत आहेत.

'भ्रष्टाचार हाच आता शिष्टाचार झाला आहे' : सर्व सरकारी यंत्रणांचा आपल्या सोयीने वापर करून निवडणुका घेतल्या जातात, त्याचे निकालही सत्ताधारी पक्षाच्या बाजूने वळवले जातात. ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, विधानसभा, राज्यसभा, विधानपरिषद, लोकसभा इतकेच काय तर तळागाळातील सार्वजनिक तसेच धर्मादाय संस्थांच्या बाबतीतही तोच प्रकार सध्या अगदी राजरोसपणे पाहायला मिळतो आहे आणि त्याचा पायंडा पडत चालला आहे, हे एक सामान्य नागरिक म्हणून मनाला अजिबात पटत नाही तसेच रुचतही नाही. वयोपरत्वे, हे सर्व निमूटपणे सहन करण्यापलीकडे आपण काहीही करू शकत नाही, ह्याचे शल्य मात्र सतत बोचत राहते आहे.

सर्व व्यवस्था जर का अशी भ्रष्ट झाली असेल तर आपल्या देशाचे नजीकच्या काळातील भवितव्य किती अंधःकारमय आहे हे सांगायला कोण्या ज्योतिषाची गरज नाही.

शेतकरी बिचारा ह्या सगळ्यात कधी 'अस्मानी' तर कधी 'सुलतानी'च्या जात्यात भरडला जातो आहे. त्याला तर कोणी वालीच उरला नाही अशी अवस्था आहे. त्याच्या हातात 'आत्महत्या' एवढे एकच साधन उपलब्ध आहे. त्याचा तो नित्यनेमाणे वापर करतो आणि आपला संसाराचा विस्कोट करून त्यांना ह्या राजकीय यंत्रणेच्या स्वाधीन करून स्वतःची मात्र सुटका करून घेतो आहे. हा व्यथित बळीराजा जेव्हा अन्नधान्य पिकवायचे थांबवेल तेव्हाच आपल्याला त्याच्या अस्तित्त्वाची आणि त्याच्या कष्टाची जाणीव होईल. शेतकऱ्याला रामराज्याची थोडीशीही आशा उरलेली नाही. बळीराजा श्रीकृष्णाने सांगितलेल्या गीतेच्या उपदेशाप्रमाणे, कर्तव्य करताना फळाची अपेक्षा न ठेवता, मोहाचा त्याग करून आणि सर्व कर्मे ईश्वराला अर्पण करून समतेने जगतो आहे आणि तोच त्याच्या जीवनाचा ध्यास आहे, म्हणूनच का होईना आज आपण खाऊन पिऊन मस्तीत जगतो आहोत, असे मला वाटते.

काही निवडक लोकांच्या हाती ह्या दोन-तीन दशकात इतका पैसा आला आहे की, त्यांच्यातल्या अहंकारी आणि गर्विष्ठ वृत्तीने ते संपूर्ण देशालाच वेठीस धरत आहेत. त्यात जे कोणी त्यांना मदत करत आहेत त्यांना सुद्धा त्यांचा अंत किती जवळ आला आहे, ह्याची जाणीवच होत नाहीय, हीच एक धोक्याची घंटा आहे. एक म्हण आहे ना, 'कर भला, तो हो भला, बुरे का, अंत बुरा' तसेच 'अती तिथे माती' हेही त्रिकालबाधित सत्य आहे जे आज नाही तर येणारा काळच ठरवेल. प्रभू श्रीरामाचा त्याग आणि श्रीकृष्णाची कर्म नीती यांच्या आध्यात्मिक संस्कारावर तर आजवर आपला देश जगावर अधिराज्य करतो आहे आणि स्वतःचे सांस्कृतिक वेगळेपण ठळकपणे मिरवत आहे परंतु आज राजकीय स्वार्थापोटी सध्या जो काही खेळखंडोबा चालला आहे आणि निर्लज्जपणाचा कळस चालला आहे तो आपल्याला नजीकच्या भविष्यात पुनः एकदा गुलामगिरीच्या वाटेने घेऊन जातो आहे की काय असे मला तरी अगदी प्रकर्षाने वाटते आहे. ह्या सगळ्याचा दोष द्यायचा तरी कोणाला? राजकारणाला, समाजकारणाला, भ्रष्टाचाराला, व्यवस्थेला, परिस्थितीला, निसर्गाला, पृथ्वीला, ईश्वराला, नैतिकतेला, धर्मनिष्ठेला, माणसाला, राज्यघटनेला, स्वातंत्र्याला की आपल्याच कर्माला? शेवटी फक्त एकच म्हणावेसे वाटते, कृपया आमच्या धार्मिक अस्मितेचा तुमच्या राजकीय स्वार्थापायी बळी देऊ नका. अन्यथा 'जसे करावे, तसे भरावे लागते', हे विसरून जाऊ नका.

सध्याच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीवर भारताचा एक प्रामाणिक नागरिक म्हणून माझी ही त्यातल्या त्यात सौम्य शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त करावीशी वाटली म्हणून हा लेखप्रपंच. 'शहाण्याला शब्दाचा मार.'

**जय श्रीराम!**

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# जैसी देणावळ तैसी धुणावळ




**जनार्दन देवरे**
मनमाड
९०११६९४८८५






## मसाला पान

**( नोंद – या लघुनाट्यांशातील सर्व पात्रे काल्पनिक असून ती कुणाच्या वर्तनाशी वा व्यक्तिमत्त्वाशी जुळून आल्यास तो निवळ योगायोग समजावा.)**

(सायंकाळची वेळ.सेवक बाल्कनीत मजेत गाणे म्हणत फिरत आहे.)

**सेवक –** पड रे पाण्या, पड रे पाण्या... कर पाणी पाणी!

(याच चालीवर दुसरे गाणे गात.)

येरे पावसा येरे पावसा
देतो तुला पैसा
पैसा झाला खोटा आणि
आला पाऊस मोठा...!
होऽ होऽ आला पाऊस मोठा...!!

(फाकडोजी महाराज पान चघळतच राणी साहेबांसोबत बाल्कनीत प्रवेशतात. सेवकाचे गाणे व विचित्र हालचाली पाहून राणीसाहेब आनंदाने टाळ्या वाजवत हसायला लागतात.)

**महाराज –** वा! व्वा! येईल हो पाऊस! तुझ्या या चित्रविचित्र हालचाली आणि पहाडी आवाज ऐकून नक्की येईल पाऊस. ढगांना घाम फुटलाय बघ तुझे आर्जव ऐकून. होय की नाही राणीसरकार?

(राणीसाहेब मिस्किलपणे हसतात. सेवक जरा चाचपडतो व वाकत मुजरा करीत.)

**सेवक –** जय हो! विजय हो महाराज! राणीसाहेब आपलाही विजय हो! मी आपलं सहज जरा सायंकाळी मन रमावं म्हणून...!

**महाराज (हसतच) –** सहज जरा एन्जॉय असंच ना? करा करा एन्जॉय करा...! आणि कालपासून पाऊस सुरुही झालाय की!

(सेवक वरमतो.) **सेवक –** पण मनाजोगता नाही बरसत ना अजून. नुसतेच अधूनमधून फव्वारे अन् उन्हाचे गाणे गा रे...! असं चाललंय म्हणून.

**राणीसाहेब –** अरे पण तू मूळ गाण्याची पार वाट लावतोयेस की... एकातून दुसरं आणि दुसऱ्याला पहिल्याची चाल! गंमत आहे नाही.

**महाराज –** आमचा सेवक म्हणजे अजब रसायन आहे. तो कवी असल्याने असे वेगवेगळे प्रयोग करणारच ना! आता पाऊस-संमेलने वगैरे सुरू होतील म्हणून सराव चालू असेल कदाचित त्याचा पण बरं का रे सेवका, आता सर्वत्र पावसाची दमदार एन्ट्री झालीये. खांदेशात तर रेकॉर्डतोड पाऊस झालाय. मान्सूनने सारा महाराष्ट्र व्यापलाय हं! त्यामुळे आता चिंता नको...!

राणीसाहेब – ते ठाऊक आहे हो पण गायकीही? विशेष आहे नाही?

**महाराज –** त्यात काय विशेष? हल्ली नव्वद टक्के कवी गाऊनच कविता सादर करतात पण त्यात आशय कमी अन् आविर्भाव जास्त! अनेक संमेलनात आम्ही अनुभवलय ते! त्यात पुन्हा कवी असण्यापेक्षा कवी दिसण्याचे प्रयत्नच जास्त...! (महाराज स्वतःवरच खूश होत हसतात.)

**राणीसाहेब –** यात पुन्हा मराठी भाषेची काय लागायची ती वाटही लागतेच म्हणे! मराठी भाषेला अभिजात वगैरे दर्जा मिळाल्यापासून तर कवी मंडळी जास्तच बहरायला लागलेत असं ऐकलंय.

काल आमची एक कवयित्री सखी बोलली आम्हाला, की मराठी साहित्याला विशेषतः कवींना फार चांगले दिवस आलेत म्हणे! काही तर पूर्ण वेळ कविता-रत असतात. कविताच त्यांचा श्वास अन् कवितेला चेकची आस असं आहे म्हणे!

**सेवक –** पण कवितेने काय घर चालतं का मॅडम? सॉरी राणीसरकार!

**राणीसाहेब –** असू दे, असू दे! मॅडम ही आता मराठी शब्दच मानला जातो हं! काल त्या अध्यक्षमहोदयांनी... म्हणजे नॉर्वेकरांनी नाही का मराठीची पार वाट लावलीये सभागृहात!

**महाराज –** नको राणीसरकार, तो विषय नको आता. पार बेअब्रू झालीय हो! पण आज त्यांनी फॉन्ट बारीक असल्याचा खुलासा करून दिलगिरीही व्यक्त केलीय ना आणि...

**राणीसरकार –** हो की! खरंच हो! पण हे सार ना अगदी 'मला नाही आबरू अन् मी कुणाला घाबरू....!' असं नाही का हो वाटत? आणि अलीकडे राजकारण्यांची भाषा म्हणजे - दात घशात घालीन, टपकाविल, बुकलून काढणे, उताणे पाडणे, ठोकून काढीन, छाताडावर बसणे, तंगडे तोडणे, काय आणि काय...? ऐकताना मतदार पार घेरी यायला लागलीय अलीकडे! हे वाक्प्रचार, क्रियापदे भविष्यात घरोघरी वापरली जाऊ लागली तर?

(सेवक मोठ्याने हसतो आणि म्हणतो)

**सेवक –** आता दिल्लीतही आपले नेते अशीच भाषा वापरताहेत महाराज.

**राणीसरकार –** हो ना! आम्ही तर ऐकलंय की, एका शिवराळ वक्तव्य करणाऱ्या मराठी नेत्याला दिल्लीतील पत्रकाराने विचारले की, तुम्ही शिवराळ भाषा / गालीगलोच का वापरता? तर उत्तर काय, म्हणे, हमारी मराठी ऐसीच है! (कपाळावर हात मारून घेत.) मराठीची प्रतिमाच डागाळली जातेय यामुळे. मराठीचा बेताल वापर रोखायला हवा. नाही तर काही खरं नाही! भविष्यात मराठीची आणखी कोणकोणती रूपं पाहायला मिळतील याचा विचार करूनच!

**सेवक –** हे सारं आमच्यासारख्या मतदारांचंच कर्म. भोगतोय आता. ते म्हणतात ना, जैसी देणावळ तैसी धुणावळ!

**महाराज –** अरे एवढं नका टार्गेट करू एखाद्याला. आपलीच माणसं, सांभाळून घ्यायचं.

(काही तरी आठवल्यासारखं करीत) आणि हो, आज त्या चॅनेलवाल्या मॅडम येणार होत्या सायंकाळी सात वाजता. प्रधानजी त्यांना घेऊन येणार होते. काय झालं त्याचं?

**सेवक –** हे नाही बुवा मला माहीत महाराज...! कुणी नाही कळवलं आम्हास.

**राणीसरकार –** का येताहेत ते चॅनेलवाले? काही खास कारण..? (कपाळावर आठ्या आणित) आणि प्रधानजींनी आम्हालाही खबर लागू दिली नाही!

**महाराज –** अहो राणीसरकार आम्ही सांगणारच होतो बघा पण दुपारी तुम्हाला पण वामकुक्षी जरा लांबली अन् राहिलंच सारं...!

**राणीसरकार –** सात तर वाजत आले आहेत पण आम्ही येईपर्यंत जरा टाईमपास करा. चहा-बिस्किटं द्या त्यांना! येतोच आम्ही तयार होऊन.

(राणीसरकार मानेला झटका देत आत जातात.)

**महाराज –** म्हणजे मेकअप करून असंच ना!

(महाराज मोठ्याने हसतात.)

**सेवक –** पण महाराज, एक विचारू का?

**महाराज –** नको! जा आता आणि त्या चॅनेलवाल्या मॅडमला घेऊन ये आत.

**सेवक –** होय महाराज! जय हो! विजय हो!!

(सेवक मुजरा करीतच बाहेर जातो. महाराज कसल्या तरी विचारात गढून जातात. तेवढ्यात प्रधानजी बाल्कनीत प्रवेशतात.)

**प्रधानजी –** महाराज, जय हो! विजय हो..!

**महाराज –** प्रधानजी, का हो आलेत का ते चॅनेलवाले?

**प्रधानजी –** त्यांचं रद्द झालंय आजचं महाराज. तेच तर सांगायला आलोय मी. काही तरी अमेरिकेसोबतच्या व्यापार करारावर चर्चासत्र चालू होणार आहे आता मुंबईत सायंकाळी. म्हणून अर्जंट तिकडेच जावं लागतंय म्हणे !

**महाराज –** म्हणजे व्यापार महत्त्वाचा! ठीक आहे. असो.

(राणीसरकार नटून थटून येतात.)

**राणीसरकार –** आलेत का ते चॅनलवाले? साडेसात झालेत आता. आम्हाला उद्याच्या वटसावित्री पौर्णिमेची तयारी करायचीये अजून... छे! सारी तयारी वाया गेली!

**प्रधानजी –** तसं नव्हे राणीसरकार! आपण तरी काय करणार? चॅनेलवाल्यांना मालक सांगेल तिकडे पळावं लागतं शिवाय टीआरपीमुळे सारेच हतबल!

**महाराज –** सत्तेची गुर्मी अन् खोक्यांची गर्मी पाहून त्यांना विषय चालवावे लागतात. सारीच आश्वासने किंवा दिलेला शब्द पाळणं परिस्थितीमुळे अवघड होऊन बसतं कधीकधी! आम्हालाही दिल्लीश्वरांच्या आदेशापुढे झुकावंच लागतं. बघताय ना आपण...!

**राणीसरकार –** होय गं बाई! खरंच आहे तुमचं. सारे वेळ पाहून वेळ मारून नेतात हेच खरं! चला, आता भोजनाची वेळ झालीय!

**महाराज –** हो हो! चला पुढे तुम्ही पण खरं सांगू का राणीसरकार आज सायंकाळपासून आपल्यासोबत जी सर्वंकष वगैरे चर्चा झाली ना ती खरोखरच उपयुक्त आणि लक्षणीय भविष्यवेधी वाटतेय आम्हाला!

**राणीसरकार –** कौतुक पुरे आता! आणि हो तुमचं बोलणं आता जरा जास्तच अभिजात वगैरे वाटू लागलंय हं! (हसतच महालातील मुदपाकखान्याकडे जातात.)

**प्रधानजी –** व्वा महाराज, छान जमतंय हो तुम्हाला कुटुंबाचा योग्य बॅलन्स राखणं.

**महाराज –** बॅलन्स नाही हो, संतुलन म्हणा. या आता! आणि जाताना जर सेवक भेटला तर सांगा त्याला आता घरी जायला.

**प्रधानजी –** आज्ञा महाराज! जय हो! विजय हो! पण तुमचं ते मसाला पान?

**महाराज –** आज राणीसाहेबांच्या हातचं कळीदार मसाला पान खाऊ आम्ही. या आता आणि पुन्हा ते चॅनेलवाले वगैरे इकडे फिरकता कामा नये. आमचा टीआरपी जोखतात होय! मला काय ते चमकवणार होय? उद्या या दरबारात लवकर!

**प्रधानजी –** पण उद्या वटसावित्री पूजन...! सुट्टी वगैरे?

**महाराज –** उगाच फालतू विनोद नको. तुम्ही काय बाभळीला फेऱ्या मारणार आहात? या आता.

(दोघेही हसतात.)


**प्रधानजी –** जय हो! विजय हो!!


(प्रधानजी व महाराज एकमेकांच्या विरुद्ध दिशेने चालू लागतात.)

( पडदा पडतो.)


## वेलची

**राजकारण्यांची आश्वासने म्हणजे निवडणुकीच्या पावसाळ्याआधीचे ढग.**





**गेल्या काही वर्षात शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभाव झपाट्याने वाढताना दिसतो. 'स्मार्ट क्लासरूम', 'ई-लर्निंग', 'ऑनलाइन शिक्षण', 'टॅबलेट योजना' यासारख्या संकल्पना आज शाळा आणि महाविद्यालयांच्या केंद्रस्थानी आल्या आहेत. कोविड-१९ महामारीनंतर तर डिजिटल शिक्षणाला अधिक गती मिळाली आणि शिक्षणप्रक्रिया मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन माध्यमांवर अवलंबून राहिली. या बदलामुळे शिक्षण अधिक आधुनिक, आकर्षक आणि सुलभ झाले, हे निश्चितच मान्य करावे लागेल.**




# डिजिटलच्या पलीकडे शिक्षण

## संतुलनाची खरी गरज



**मयूर बागुल**
**शेती प्रश्नांचे अभ्यासक आणि राज्य पुरस्कार प्राप्त लेखक.**
९०९६२१०६६९


विद्यार्थ्यांना जगभरातील माहिती काही सेकंदात उपलब्ध होते, दृश्य-श्राव्य साधनांमुळे अवघड संकल्पनाही सोप्या पद्धतीने समजतात आणि शिकण्याची प्रक्रिया अधिक संवादात्मक होते. मात्र या सर्व सकारात्मक बदलांमागे काही गंभीर प्रश्नही उभे राहतात. शिक्षणाचा खरा उद्देश केवळ माहिती मिळवणे नसून विद्यार्थ्यांची विचारशक्ती, विश्लेषण क्षमता, सर्जनशीलता आणि मूलभूत कौशल्ये विकसित करणे हा आहे. जर तंत्रज्ञानाचा अतिरेक झाला तर ही मूलभूत उद्दिष्टे दुर्लक्षित राहण्याचा धोका निर्माण होतो. म्हणूनच 'डिजिटल शिक्षण' आणि 'पारंपरिक शिक्षण' यामध्ये संतुलन राखणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे.

सध्याच्या शैक्षणिक परिस्थितीकडे पाहिले असता, विद्यार्थ्यांच्या मूलभूत कौशल्यांची स्थिती अजूनही चिंताजनक आहे. ASER २०२२ च्या अहवालानुसार, इयत्ता पाचवीतील सुमारे निम्मे विद्यार्थी इयत्ता दुसरीच्या पातळीवरील मजकूर वाचण्यात अडचण अनुभवतात. तसेच साध्या गणितीय क्रिया जसे की भागाकारही अनेक विद्यार्थ्यांना करता येत नाहीत. ही परिस्थिती दर्शवते की, शिक्षणाच्या पायाभूत स्तरावर अजूनही मोठी तफावत आहे. अशा परिस्थितीत केवळ डिजिटल साधनांवर भर देऊन शिक्षणाची गुणवत्ता सुधारेल, अशी अपेक्षा करणे वास्तववादी ठरणार नाही. महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात शिक्षणव्यवस्थेचा व्याप अत्यंत व्यापक आहे. लाखो विद्यार्थी, हजारो शाळा आणि मोठ्या संख्येने शिक्षक यांचा समावेश असलेल्या या व्यवस्थेत कोणतेही धोरण प्रभावीपणे राबवणे हे मोठे आव्हान असते. UDISE च्या आकडेवारीनुसार राज्यात सुमारे १.०८ लाख शाळा आणि २ कोटींहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर डिजिटल सुविधा पोहोचवणे आणि त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित करणे हे अत्यंत जटिल काम आहे.


डिजिटल पायाभूत सुविधांच्या बाबतीत काही प्रमाणात प्रगती झालेली दिसते. अनेक शाळांमध्ये संगणक, प्रोजेक्टर आणि इंटरनेट सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. काही वर्षांपूर्वी ज्या शाळांमध्ये संगणक सुविधा अत्यल्प होती, त्या तुलनेत आता मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. इंटरनेट कनेक्टिव्हिटीही सुधारली आहे. या प्रगतीमुळे डिजिटल शिक्षणाचा पाया मजबूत होण्यास मदत झाली आहे. तथापि, ही प्रगती सर्वसमावेशक नाही. अजूनही अनेक ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांमध्ये आवश्यक साधनांची कमतरता आहे. काही शाळांमध्ये संगणक असले तरी ते कार्यरत नसतात किंवा त्यांचा वापर मर्यादित असतो. इंटरनेट सुविधा सर्वत्र उपलब्ध नाही आणि ज्या ठिकाणी आहे, तिथेही ती स्थिर नसते. यामुळे 'डिजिटल दरी' (Digital Divide) अजूनही कायम आहे. विद्यार्थ्यांच्या पातळीवरही ही विषमता स्पष्टपणे जाणवते. सर्व विद्यार्थ्यांकडे स्मार्ट फोन किंवा इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही. अनेक कुटुंबांमध्ये एकच मोबाइल फोन असतो, जो सर्व सदस्यांना वापरावा लागतो. त्यामुळे ऑनलाइन शिक्षणाचा लाभ सर्वांना समान प्रमाणात मिळत नाही. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसतो. याशिवाय, वीजपुरवठ्याची समस्या देखील मोठी अडचण ठरते. काही शाळांमध्ये नियमित वीज उपलब्ध नसल्यामुळे डिजिटल साधनांचा वापर प्रभावीपणे करता येत नाही. यावरून स्पष्ट होते की, केवळ उपकरणे उपलब्ध करून देणे पुरेसे नसून त्यासाठी आवश्यक असलेली आधारभूत संरचना मजबूत करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शिक्षणाच्या विविध स्तरांनुसार डिजिटल आणि पारंपरिक पद्धतींचा वापर वेगवेगळ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षण (इयत्ता १ ते ५) हा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाचा पाया घालणारा टप्पा असतो. या वयोगटात वाचन, लेखन, हस्तलिखित सराव, शिक्षकांसोबत प्रत्यक्ष संवाद आणि खेळांच्या माध्यमातून शिकणे अधिक प्रभावी ठरते. त्यामुळे या स्तरावर पारंपरिक शिक्षणपद्धतीला प्राधान्य देणे गरजेचे आहे आणि डिजिटल साधने केवळ पूरक म्हणून वापरली जावीत.



माध्यमिक स्तरावर (इयत्ता ६ ते १०) विद्यार्थ्यांची समज वाढू लागते, त्यामुळे डिजिटल साधनांचा वापर थोड्या अधिक प्रमाणात करता येतो. व्हिडिओ, ॲनिमेशन आणि सिम्युलेशन यांच्या मदतीने विज्ञान आणि गणितातील संकल्पना अधिक स्पष्टपणे समजावून सांगता येतात. उच्च माध्यमिक स्तरावर तर डिजिटल साधनांचा वापर अधिक प्रभावी ठरतो कारण या टप्प्यावर विद्यार्थ्यांना स्व-अभ्यासाची सवय लागलेली असते. या संपूर्ण प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक वेळा शाळांमध्ये डिजिटल साधने उपलब्ध असतात पण शिक्षकांना त्यांचा प्रभावी वापर कसा करायचा याचे प्रशिक्षण नसते. परिणामी, ही साधने केवळ औपचारिकतेपुरती मर्यादित राहतात. त्यामुळे शिक्षक प्रशिक्षणावर विशेष भर देणे आवश्यक आहे. शिक्षकांना तांत्रिक कौशल्यांसोबतच डिजिटल साधनांचा शैक्षणिक उपयोग कसा करायचा हे शिकवणे गरजेचे आहे. तसेच स्थानिक भाषेत गुणवत्तापूर्ण डिजिटल सामग्री तयार करणेही अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना जर त्यांच्या मातृभाषेत समजणारी सामग्री उपलब्ध झाली तरच ते प्रभावीपणे शिकू शकतील. अन्यथा, इंग्रजी किंवा इतर भाषांमधील सामग्रीमुळे त्यांना अडचणी येऊ शकतात आणि त्यांचे अभ्यासावरील लक्ष विचलित होऊ शकते. आरोग्याच्या दृष्टीने स्क्रीन टाइमवर नियंत्रण ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

लहान वयातील मुलांमध्ये जास्त वेळ स्क्रीनसमोर बसल्यामुळे डोळ्यांचे विकार, झोपेच्या समस्या आणि मानसिक ताण वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे शिक्षणात डिजिटल साधनांचा वापर करताना मर्यादा पाळणे आवश्यक आहे. नियमित विश्रांती, मैदानी खेळ आणि प्रत्यक्ष संवाद यांना प्राधान्य दिले पाहिजे. डिजिटल शिक्षणाचा विचार करताना तीन महत्त्वाच्या स्तरांचा विचार करावा लागतो. प्रवेश (Access), वापर (Usage) आणि परिणाम (Learning Outcomes). प्रवेशाच्या बाबतीत काही प्रमाणात प्रगती झाली आहे कारण शाळांमध्ये साधने उपलब्ध झाली आहेत परंतु वापराच्या बाबतीत अजूनही मर्यादा आहेत कारण शिक्षक प्रशिक्षण आणि तांत्रिक सहाय्य अपुरे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे परिणामाच्या स्तरावर अपेक्षित सुधारणा अजून दिसून आलेली नाही. आर्थिक दृष्टिकोनातूनही या विषयाचा विचार करणे आवश्यक आहे. डिजिटल साधनांवर मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यापूर्वी त्याचा प्रत्यक्ष शैक्षणिक परिणाम काय होतो, याचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे. अन्यथा, मोठ्या गुंतवणुकीनंतरही अपेक्षित परिणाम मिळाले नाहीत तर तो खर्च निष्फळ ठरू शकतो. शेवटी शिक्षणाचा गाभा हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात आहे. तंत्रज्ञान हे या प्रक्रियेला सहाय्य करणारे साधन आहे, पर्याय नाही. पारंपरिक पद्धतीतील सखोल वाचन, लेखन, सराव आणि शिक्षक-विद्यार्थी संवाद यांना तंत्रज्ञानाची जोड दिल्यास शिक्षण अधिक प्रभावी होऊ शकते. जर राज्याने संतुलित, विचारपूर्वक आणि पुराव्याधारित दृष्टिकोन स्वीकारला तर शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम, समावेशक आणि गुणवत्तापूर्ण होईल. अन्यथा, डिजिटल साधनांची संख्या वाढेल; परंतु शिक्षणाचा पाया कमकुवत राहण्याचा धोका कायम राहील. म्हणूनच 'डिजिटलच्या पलीकडे शिक्षण' या संकल्पनेचा विचार करताना संतुलन राखणे हीच खरी गरज आहे. ■

**संतुलित शिक्षणाची गरज**




संतुलनातून गुणवत्तापूर्ण शिक्षण

# भावभावनांचा कोलाज : शब्दतृप्ती


**नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'शब्दतृप्ती' कवितासंग्राची 'चपराक'चे प्रकाशक घनश्याम पाटील यांनी लिहिलेली प्रस्तावना...**

तृप्ती म्हणजे समाधान! एखादं काम पूर्ण झाल्यावर मिळणारं मानसिक सुख, पोट भरल्यानंतर होणारा आनंद, इतकंच कशाला एखाद्या आईनं तिच्या बाळाकडं प्रेमभरानं बघितलं तरी ज्या प्रेमलहरी निर्माण होतात त्या तृप्त करणाऱ्या असतात. तृप्ती ही मनाशी, शरीराशी, सुखाशी संबधित विलक्षण भावना आहे. मग ही तृप्ती जर शब्दांची असेल तर...? आहा! क्या बात है...! विविध भावभावनांचा कोलाज साधत तृप्ती वाकोडकर-देशपांडे या कवयित्रीनं या संग्रहाच्या माध्यमातून असाच 'शब्दतृप्ती'चा सुंदर आविष्कार घडविला आहे. म्हणूनच या संग्रहाचं 'शब्दतृप्ती' हे शीर्षक यथार्थ ठरणारं आहे.

आचार्य मम्मटांनी सांगितलं होतं की, 'लेखन हे स्वान्तसुखाय असावं.' कसल्याही अपेक्षेविना जी उत्स्फूर्त अभिव्यक्ती असते ती नेहमीच सर्वश्रेष्ठ ठरते. लिहिणाऱ्याला एकवेळ व्याकरण कळलं नाही तरी चालेल पण अंतःकरण कळलंच पाहिजे. त्यातून भावना बरसायला हव्यात.

**कवितेचा शब्दशः**
**कधीच लावायचा नसतो अर्थ**
**नाही तर फक्त शब्दच दिसतात**
**अन् भावना होतात व्यर्थ**

असं लिहिणाऱ्या तृप्ती वाकोडकर-देशपांडे यांच्या या कवितांतून जीवनाचे अनेक रंग दिसतात. कवितेच्या माध्यमातून त्यांना ना कुणाला काही




शिकवायचंय, ना कसले उपदेशाचे डोस पाजायचेत. आपल्या जीवनातील निखळ आनंदाची पेरणी करताना वेळोवेळी जसं व्यक्त व्हावंसं वाटतं तसं त्या लिहित गेल्यात. त्यात कधी नवऱ्यासोबतचं लाडीगुडीचं भांडण असतं, आठवणींचा भोवरा असतो, मैत्री, प्रेम, विरह, आई-वडील, सासू-सासरे, आजी, विठ्ठल, चिमणी किंवा पाऊस असं काहीही असू शकतं.

रोजच्या जगण्याशी संबंधित जे विषय होऊ शकतात, त्यांना स्पर्श करताना त्या वाचकांना त्यात गुंतवून ठेवतात. हलक्या-फुलक्या शैलीत वास्तव मांडतानाच त्यांना अंतर्मुख व्हायलाही भाग पाडतात. सरस्वतीमातेच्या दरबारात पहिलंच पाऊल ठेवताना एका तरल वृत्तीच्या कवयित्रीकडून आणखी काय हवंय?

डॉ. अशोकराव वाकोडकर हे मराठवाड्यातील साहित्य आणि समीक्षेच्या प्रांतातलं एक मोठं नाव. त्यांच्या कन्येनं त्यांचा साहित्याचा हा वारसा निगुतीनं जपलाय. अलक, लघुकथा आणि कविता हे त्यांच्या जिव्हाळ्याचे साहित्यप्रकार. त्यांचं पहिलंच पुस्तक कवितांचं असलं तरी त्या थांबणाऱ्यापैकी नाहीत. उत्तमतेचा ध्यास घेतलेली ही लेखिका भविष्यात साहित्याच्या प्रांतात आपला अवीट ठसा उमटवेल.

**नशिबाचे भोग म्हणत**
**आता रडत नाही बसायचं**
**आपलं दुःख मनात ठेवून**
**आपल्यासाठी हसायचं / संघर्ष**

**एकदा उघडून पाहा स्वतःचीच**
**झाकलेली बंद मूठ**
**आपल्याच ओंजळीत गवसेल**
**हरवलेलं आपलं सुख / वास्तव**

**हेवे-दावे, रुसवे-फुगवे**
**लोटले आहे दूर सारे**
**म्हणूनच आता मनात माझ्या**
**आनंदाचे वाहते वारे / आयुष्याच्या वळणावरती**

अशा अनेक कडव्यांतून कवयित्रीचे चांगुलपण, तिचा ठाम निर्धार, आत्मविश्वास आणि प्रेरणेचा झंकार दिसून येतो आणि हा शब्दतृप्तीचा प्रवास उलगडत जातो.

मनमंदिरी वसलेला कान्हा श्वास झालेल्या राधेच्या भावना, सर्जाच्या ऋणातून उतराई शक्य होणार नाही असे सांगणारी बैलपोळा, एका प्रसिद्ध संपादक आणि तडफदार पत्रकाराच्या प्रेमाचं अनोखं नातं, स्वतः हळवी असूनही हिंमत देणारी मैत्रीण, लक्षात राहणारा रेल्वे प्रवास, सासू-सासऱ्यांची आषाढी वारी अशा अनेक प्रसंगातून कवयित्रीचं समृद्ध जीवनानुभव आणि व्यापक दृष्टिकोन दिसून येतो.

**खरं तर मी मुळीच बदलले नाही**
**पण दादा मात्र खूप बदलला**
**लग्न होऊन मी सासरी आले**
**आणि दादा माझा हळवा झाला**

या 'दादा' कवितेतील ओळी आणि एकंदरीत कविता वाचतानाही गहिवरून येते. राखीपौर्णिमेवरील कविताही वाचनीय आहे. या कवितासंग्रहात प्रेमळ बायको दिसते, कुटुंबवत्सल सून दिसते, बहीण दिसते, मुलगी दिसते, मैत्रीण दिसते, अल्लड पण तितकीच प्रगल्भ प्रेमिका दिसते, एकंदरीत स्त्रियांची सर्व रूपे ठळकपणे अधोरेखित होतात. या सर्व भावना वाचकांना आपल्या वाटतात. म्हणूनच कवयित्रीच्या विचारांशी तो सहजपणे एकरूप होऊन जातो.

प्रतिमा, प्रतिकांच्या रूपकांत न अडकलेली, छंदाच्या हव्यासाचा सोस नसलेली, वाचकांना शब्दबंबाळ न करणारी ही निखळ अनुभूती आहे. आपल्या प्रत्येकाच्या मनातली एखादी तरी भावना यात सुस्पष्टपणे दिसून येईल.

कधी अचानक गालावर हसू येईल तर कधी एखाद्या ओळीने आपण विचारशृंखलात अडकून पडू! तृप्ती वाकोडकर-देशपांडे या कवयित्रीचं हे सामर्थ्य आहे. भविष्यात त्यांच्या हातून असेच उत्तमोत्तम लेखन घडो आणि मराठवाड्याच्या मातीतील हा दरवळ सर्वत्र पोहोचो याच मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

# बालकुमारांसाठी गुरू ठाकूर यांच्या खास चित्रकथा

## 'लाडोबा'तर्फे मराठी आणि इंग्रजी आवृत्ती ऑनलाईनही उपलब्ध


**पुणे :** तू बुद्धी दे, तू तेज दे..., असे जगावे छाताडावर आव्हानाचे लावून अत्तर अशा एकाहून एक सरस आणि प्रेरणादायी कवितांचे कवी, प्रतिभावान गीतकार, पटकथा-संवादलेखक आणि प्रसिद्ध अभिनेते गुरु ठाकूर आता एका नव्या भूमिकेतून बालवाचकांच्या भेटीस आले आहेत. तब्बल २५-३० वर्षांनंतर गुरु ठाकूर यांनी पुन्हा एकदा आपल्या जुन्या कार्टुनिस्ट (व्यंगचित्रकार) भूमिकेची आठवण जागी करत बालचमूंसाठी चित्रकथांचे एक विशेष पुस्तक साकारले असल्याची माहिती प्रकाशक घनश्याम पाटील यांनी दिली.


'लाडोबा प्रकाशन'तर्फे हे पुस्तक मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये एकाच वेळी वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. यातील मराठी पुस्तकाचे शीर्षक 'गोष्ट छोटी, शिकवण मोठी' असे असून इंग्रजी पुस्तक 'टायनी टेल, वाईज ट्रेल' या नावाने बालवाचकांच्या भेटीस आले आहे.

आपल्या कारकिर्दीची सुरुवात एकेकाळी 'नवा काळ'सारख्या ख्यातनाम दैनिकातून व्यंगचित्रकार म्हणून करणारे गुरु ठाकूर मधल्या काळात चित्रपट, नाट्य आणि संगीत विश्वात पूर्णपणे व्यग्र झाले होते; मात्र काही दिवसांपूर्वी एकदा सहज गप्पांच्या ओघात त्यांनी एक महत्त्वाचा विचार मांडला होता की, ''जसा काळ बदलतो, तशा मुलांसाठीच्या गोष्टी, बोधकथा आणि त्यातील संदर्भही बदलायला हवेत. आजच्या डिजिटल युगातील मुलांच्या भावविश्वाशी आणि अनुभवांशी नाते सांगणाऱ्या कथा निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे.'' हाच विचार लाडोबा प्रकाशनने अत्यंत गांभीर्याने आणि मनापासून उचलून धरला. प्रकाशकांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि प्रोत्साहनामुळे गुरु ठाकूर यांनी दैनंदिन कामाच्या धावपळीतून वेळ काढत या कल्पनेवर काम केले आणि बघता-बघता या नव्या कॉमिकचा जन्म झाला.

बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या गुरु ठाकूर यांचे मुलांसाठीचे हे पहिलेच स्वतंत्र पुस्तक आहे. विशेष म्हणजे या पुस्तकातील सर्व कथा, त्यातील चित्रांची संकल्पना, रेखाटने आणि संपूर्ण मांडणी खुद्द गुरु ठाकूर यांनीच साकारली आहे. त्यामुळे कवी आणि लेखकासोबतच त्यांच्यातील जुना संवेदनशील चित्रकार या निमित्ताने पुन्हा एकदा रसिकांसमोर येणार आहे. ''मुलांसाठी काम करताना त्यांच्या वयाचे होऊन, त्यांच्या भावविश्वात शिरण्याचा जो आनंद मिळतो, तो खरोखर दैवी असतो,'' अशा भावना गुरु ठाकूर यांनी या प्रवासाबाबत बोलताना व्यक्त केल्या.

या पुस्तकाच्या निमित्ताने गुरु ठाकूर यांनी आजच्या बालमित्रांशी थेट संवाद साधत यशाची एक नवीन आणि सोपी व्याख्या मांडली आहे. ''आपल्याला बऱ्याचदा असं वाटतं की यश म्हणजे फक्त परीक्षेतले चांगले गुण, गडगंज पैसा किंवा मोठमोठी पदकं! पण खरं यश यापेक्षा वेगळं आणि सहज आहे. तुम्ही जसे आहात तसे स्वतःला स्वीकारणे, भविष्याची चिंता करण्यापेक्षा वर्तमानातील क्षणात जगता येणे आणि दैनंदिन जीवनात जे योग्य आहे तेच करणे, हेच खरे यश आहे. कौतुकसोहळे आणि बक्षिसे तात्पुरता आनंद देतात पण एक चांगली व्यक्ती म्हणून जगल्यामुळे मिळणारी शांतता आयुष्यभर सोबत राहते,'' असा कानमंत्र गुरु ठाकूर यांनी दिला आहे. तसेच मुलांनी गोष्टी वाचताना मनात प्रश्न निर्माण होऊ द्यावेत आणि ते विचार एका डायरीत लिहून ठेवावेत, असे आवाहनही त्यांनी केले आहे. कवी गुरु ठाकूर यांचे बालसाहित्यातील हे पहिलेच पाऊल 'लाडोबा प्रकाशन'च्या माध्यमातून पडले असल्यामुळे, साहित्य वर्तुळातून या उपक्रमाचे मोठे स्वागत होत आहे. मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढवण्यासाठी, त्यांना चांगल्या गोष्टींची निवड करायला शिकवण्यासाठी आणि कोणत्याही आव्हानाला धैर्याने सामोरे जाण्याची प्रेरणा देण्यासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरेल.






# बँकांचा दबदबा अजूनही कायम

भारतीय बँकांची तोंड ओळख

या सदरामध्ये वाचकांना बँकिंगची प्राथमिक माहिती, विविध योजना, त्यांची नियमावली तसेच भविष्यातल्या बँकिंगचा वेध घेण्याचा प्रयत्न मी करणार आहे. लेखमालेचा पहिला भाग बँकिंगची पार्श्वभूमी वाचकांना माहिती व्हावी यासाठी आहे. भारतामध्ये बँकिंग क्षेत्राचा विकास हा गेल्या काही वर्षांपासून अत्यंत वेगाने होत आहे. तसेच या क्षेत्रामध्ये अनेक नवनवीन बदल देखील दिसून येत आहेत. त्यामुळे बँकांचे प्रकार, त्यांचे कार्य आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील त्यांचे स्थान समजून घेणे महत्त्वाचे आहे.



श्रीराम नानल
सातारा
९६३७१३३२८०

भारतीय बँकिंग क्षेत्राची रचना ही वैविध्यपूर्ण असून त्यात अनेक प्रकारच्या बँकांचा समावेश आहे. यात प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रातील बँका (सरकारी बँका), खासगी क्षेत्रातील बँका (खाजगी बँका), लघु वित्त बँका, पेमेंट बँका आणि सहकारी बँका यांचा समावेश होतो. या प्रत्येक प्रकारच्या बँकेची स्वतःची अशी भूमिका आणि उद्दिष्टे आहेत. १९६९ मध्ये भारतामधील प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले. हा एक महत्त्वाचा आर्थिक आणि सामाजिक निर्णय होता. राष्ट्रीयकरणाच्या प्रमुख उद्दिष्टामध्ये बँकिंग सेवा सर्वांपर्यंत, विशेषतः ग्रामीण आणि दुर्बल घटकांपर्यंत पोहोचवणे याचा समावेश होता. त्याचबरोबर प्रादेशिक असंतुलन दूर करणे हेही एक प्रमुख धोरण होते. राष्ट्रीयकरणानंतर कृषी क्षेत्राला आधार मिळाला आणि कृषी उत्पादनात वाढ झाली. बँका ग्रामीण भागातल्या दुर्गम गावापर्यंत पोहोचल्या. ग्रामीण जनतेचे खासगी सावकारावरचे अवलंबित्व कमी झाले.

भारताच्या बँकिंग प्रणालीमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा दबदबा अजूनही कायम आहे. या बँकांमध्ये सरकारची मोठी भागीदारी असते. स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ बडोदा, कॅनरा बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र या काही प्रमुख सरकारी बँका आहेत. या बँकांचा मुख्य उद्देश वित्तीय समावेशन वाढवणे आणि देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासाला हातभार लावणे हा आहे. ग्रामीण भागापर्यंत बँकिंग सेवा पोहोचवण्यात या बँका महत्त्वाची भूमिका बजावतात. १९९० च्या दशकात आर्थिक उदारीकरणानंतर खाजगी बँकांचा उदय झाला. एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस बँक, कोटक महिंद्रा बँक आणि इंडसइंड बँक या प्रमुख खाजगी बँका आहेत. या बँका त्यांच्या आधुनिक सेवा, तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्राहकाभिमुख दृष्टिकोन यासाठी ओळखल्या जातात. स्पर्धात्मक वातावरणामुळे या बँकांनी ग्राहकांना विविध उत्पादने आणि सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. नागरी सहकारी बँका या सहकारी तत्त्वावर आधारित असतात आणि त्यांचे सदस्यच त्यांचे भागधारक असतात. या बँका प्रामुख्याने शहरी आणि निमशहरी भागांतील स्थानिक लोकांना आणि लहान व्यवसायांना वित्तीय सेवा पुरवतात. स्थानिक गरजा पूर्ण करणे आणि स्वयं-सहाय्य गटांना आधार देणे हा त्यांचा मुख्य उद्देश असतो. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या शेतीविषयक विविध गरजा पुरवितात. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया या बँकांवर नियंत्रण ठेवते.

या लेखमालेत आपण भारतीय बँकिंग क्षेत्रातील विविध पैलू, त्यांचे नियमन, आव्हाने आणि भविष्यातील दिशा यावर सविस्तर चर्चा करणार आहोत. बँकिंग क्षेत्रातील घडामोडींचा सामान्य नागरिक आणि अर्थव्यवस्थेवर कसा परिणाम होतो, हे समजून घेण्यासाठी ही लेखमाला निश्चितच उपयुक्त ठरेल. या पुढील लेखात आपण बँकांच्या विविध योजनांविषयी अधिक तपशीलवार माहिती घेऊया.



भरत विठ्ठल पाटील
मालेगाव, नाशिक
९६६५९११६५७

मज आवडते मनापासूनी शाळा



# निरोपाचे राजहंस...!

‘पोरांनी शाळेला खूप दिले आहे. आठवणीत राहावा असा निरोप त्यांना द्यायला हवा.’’ भामरे सर परिपाठाला पाचवीच्या विद्यार्थ्यांकडे पाहत बोलले.

सरांची मुलांशी झालेली गट्टी, जिव्हाळा सारे त्यांच्या डोळ्यात दिसत होते. तोच धागा पकडत आम्ही सर्वांनी पाचवीच्या विद्यार्थ्यांना निरोप द्यायचं ठरवलं.

नियोजनानुसार निरोपाचा दिवस उगवला. नवे कपडे घालून आलेली लेकरं उत्साहात होती. मुलांचा गोंधळ, हास्य, खेळकर आवाज सगळं काही होतं; पण वातावरणात एक वेगळीच हुरहूर दडली होती. लेकरांचा शाळेतील शेवटचा दिवस होता. पोरं सामोरी येत होती पण नजर चोरत होती. काही तरी हरवणार याची भीती काहींच्या चेहऱ्यावर दिसत होती. मुलं आवर्जून बेंचवर एकमेकांना भेटत होती. कोण कुठे शिकणार, काय करणार याच्या गप्पा सुरू होत्या. लहान वर्गातील मुलं मोठ्यांशी खेळत होती. मुलं जे जे शक्य असेल ते सारं अंतःकरणात साठवताना दिसत होती. काही नेहमीप्रमाणे फुलझाडांना पाणी घालत होती. आमच्या जिल्हा परिषद शाळेत पाचवीपर्यंतच वर्ग असल्याने उद्यापासून ही चिमुकली पाखरे नव्या शाळेच्या दिशेने भरारी घेणार होती हे सातत्याने जाणवत होते. दरवर्षी दिला जाणारा निरोप आणि आजचा निरोप यात फरक होताच.

पहिलं पाऊल पहिलीच्या वर्गात भीतभीत ठेवणारी ही मुले आज पाचवी पूर्ण करून आत्मविश्वासाने पुढच्या प्रवासासाठी सज्ज झाली होती. वर्गात अक्षरांची, वाचनाची ओळख करून घेताना हात धरून लिहायला शिकवलेली हीच मुले आज स्वतःची स्वप्ने शब्दांत मांडू लागली होती. त्यांच्या वाढीचा, यशाचा आणि निरागसतेचा प्रवास डोळ्यांसमोर तरळत होता.

तीन वर्षांच्या या प्रवासात किती तरी आठवणी जमा झाल्या होत्या. कधी अभ्यासातील यश, कधी खोड्या, कधी भांडणे तर कधी घट्ट मैत्री. शाळेच्या प्रत्येक कोपऱ्यात त्यांचे बालपण रेंगाळलं होते. शिक्षक म्हणून आम्ही त्यांना पुस्तकांतील धडे शिकवले; पण त्यांनी आम्हाला निरागसतेचे, प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे धडे दिले. या तीन वर्षातील शाळेच्या प्रगतीचा मानबिंदू ही मुलं होती.

वर्गात निरोप समारंभ सुरू झाला. आम्रपाली, वैष्णव, यश यांच्या निरोपरूपी शब्दातून गहिवरून येत होतं. देवा, राजू दादा, भामरे सर यांच्या मार्गदर्शनरूपी निरोपातून लेकरांना दिशा मिळाली. चौथीतील ईश्वरी, प्रवीण यांच्या आपल्या मोठ्या भावंडांविषयीच्या भावना बोलल्यावर पाचवीतली दिव्या वर्गातच साधनाच्या गळ्यात हात टाकून रडू लागताच सारा वर्ग भावनामय झाला. सारे ढसाढसा रडत होते. सवंगड्यांनी एकमेकांना मिठ्या मारल्या. पोरांना नेहमीच आवडणारे, जिंदगी से जंग, आनंद या जीवनाचा ही गाणी या निमित्ताने गाता आली आणि त्यांची फर्माइश पूर्ण करता आली. ‘पुन्हा भेटू या’, ‘आम्हाला विसरू नका’ अशा शब्दांत बालमनातील ओलावा व्यक्त होत होता. आम्ही त्यांना आशीर्वाद देताना एकच संदेश दिला ‘मोठे व्हा, चांगली माणसं व्हा आणि आपल्या शाळेचे नाव उज्ज्वल करा.’ या सगळ्या भावुक वातावरणात मुलांची एक खास फर्माईश होती. ‘‘सर, आज आम्हाला मंचूरियन खायचं आहे!’’ मुलांच्या या साध्या पण मनापासूनच्या इच्छेने सगळ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. मग निरोपाच्या गोड-तिखट आठवणींसोबत मंचूरियनची चवही त्या दिवसाचा अविभाज्य भाग बनली. ताई तात्यांना आम्ही मदत केली. लेकरांनीही आपले योगदान दिले. जेवणही सोबतीने बनवले गेले. पोरांची प्रत्येक घासासोबत हशा, आठवणी आणि उद्याच्या स्वप्नांची चर्चा रंगत होती हे पाहताना निरोप किती महत्त्वाचा असतो हे जाणवत होते. मित्रहो, निरोप हा शेवट नसतो; तो नव्या प्रवासाची सुरुवात असतो. ही मुले नव्या शाळेत जातील, नवे मित्र मिळवतील, नवे शिक्षक भेटतील पण पहिली ते पाचवी या प्रवासात जुळलेले ऋणानुबंध कायम त्यांच्यासोबत राहतील. शाळेच्या अंगणात उमटलेल्या त्यांच्या पाऊलखुणा आणि त्यांच्या निरागस हास्याचे प्रतिध्वनी आमच्या स्मरणात सदैव जिवंत राहतील.


निरोपाच्या दिवशी शाळेतून बाहेर पडताना पाठमोरी पाठीवर दप्तर घेतलेली ही मुले आम्हाला एखाद्या राजहंसांच्या थव्याप्रमाणे वाटत होती. आपल्या छोट्याशा तळ्याचा निरोप घेऊन विस्तीर्ण आकाशात भरारी घेण्यासाठी सज्ज झालेले राजहंस! त्यांच्या पंखात स्वप्नांचे बळ होते आणि आमच्या शुभेच्छांची उब होती. त्यांच्या घराकडे पडणाऱ्या प्रत्येक पावलांनी आमचा जीव कासावीस होत होता आणि दुसरीकडे, ‘‘सर, आम्ही आहोत ना शाळेत’’ म्हणणारी ईश्वरी आपला हात आमच्या हातात विश्वासाने देत बोलत होती.

विद्यार्थी शाळा सोडून जातात पण त्यांच्याशी जुळलेले ऋणानुबंध कधीच संपत नाहीत. ते आठवणींच्या रूपाने आयुष्यभर मनात घर करून राहतात. हे निरोपाचे राजहंस अनुभवण्याची संधी जीवनात एकदा यायलाच हवी, माणूस अंतर्मनातून बदलतो. तो प्रगल्भ होतो मिळालेल्या अनुभवांनी.





संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०



# तीन हसणारे भिक्षू



ओशोंच्या कथा

**माणसाला आयुष्यात सातत्याने आनंद हवा असतो. आनंद मिळाला की आपोआप हास्य निर्माण होते. माणसाच्या आयुष्यातील आनंद म्हणजे जीवन आहे पण हा आनंद आपल्याला खरंच मिळतो का? जेथे मिळतो आहे तो चिरकाल टिकतो का? मुळात आनंद ही भावना आहे. आपल्याला ज्या गोष्टींनी आज आनंद दिला ती गोष्ट उद्या आनंद देईल असे घडणार नाही. आपल्या आनंदाच्या वाटा प्रत्येक वेळी भिन्न आहेत. आपल्या आनंदाचे क्षण हे भौतिक सुविधांवर अवलंबून आहेत. म्हणून तो आनंद निरपेक्ष आणि टिकणारा नाही. ज्या आनंदाच्या वाटा निरपेक्ष नसतात, त्या वाटा परमानंद स्वरूपातील असण्याची शक्यता नाही.**

एखाद्या व्यक्तिला गोड आवडते. त्याला गोड खायला मिळाले की, आनंदाला पारावर राहत नाही मात्र काही दिवसांनी त्याला मधुमेह होतो. त्या मधुमेहामुळे त्याला आता गोड मिळाले तरी पूर्वीसारखा आनंद होत नाही. त्याचवेळी एखादा वारकरी असतो. तो पंढरपूर, आळंदीची वारी नित्याने करतो. त्या वारीत तो चालत जातो. चालता चालता कधी थकत नाही. थकला तरी त्याच्या चेहऱ्यावर तो भाव असत नाही. त्याला प्रत्येक पावलागणिक परमेश्वराच्या भेटीची ओढ असते. त्या भेटीतून भक्ताला मिळणारा आनंद क्षणिक नसतो. त्या आनंदाचे वर्णन करताना संत म्हणतात की, हा आंनद म्हणजे परमानंद स्वरूपाचा आहे. हा आनंद जीवनात काही मिळाले तरी इतर मार्गांनी मिळू शकत नाही. असे आनंदाचे क्षण प्रापंचिक जीवनात मिळत नाहीत. आनंदासाठी व्यावहारिकता महत्त्वाची नाही. त्यासाठी समर्पण महत्त्वाचे असते... पण आज जीवनातील आनंद, हास्य हरवले आहे. त्यामुळे जीवनातील हास्य कायम टिकावे म्हणून वाटा शोधाव्या लागतील. खरं तर परमेश्वराची प्राप्ती म्हणजे आनंदाची वाट आहे. आपण किती आनंदी आहोत त्यावर परमेश्वर आपल्या किती जवळ आहे हे ठरवता येईल.

ओशो जीवनातील आनंद, हास्याचे मोल जाणून आहेत. हास्याचे मोल सांगताना ओशोंनी सांगितलेली गोष्ट अधिक महत्त्वाची आहे. ते सांगतात की, चीनमध्ये तीन भिक्षू राहत होते. त्यांनी जीवनभर जगण्यासाठी काही तत्त्वे, नियम केली होती. त्यासाठी अधिक महत्त्वाचा एक नियम केलेला होता. कोठेही भ्रमंती करत असताना, रोजचा जीवनव्यवहार करत असताना, प्रसंग कोणताही असला तरी आणि अगदी ते कुठेही गेले तरी फक्त हसत राहायचे. त्यांना हास्याशिवाय दुसरे काहीच करता येत नसायचे. हास्य हाच त्यांचा उपदेश होता. ते भ्रमंती करत असताना कधीच कोणाला काहीच सांगत नसायचे. त्यांनी कधीच कोणाला कशासाठीच उपदेश केला नाही. एखादा भिक्षू असेल, संत असेल, प्रबोधनकार असेल तर लोकांना त्यांच्या मुखातून प्रवचन ऐकवण्याची सवय असते. त्याच प्रमाणे लोकांना देखील संत, भिक्षूंनी आपल्याला काही तरी सांगावे ही अपेक्षा असते मात्र या तिन्ही भिक्षूनी कधीच प्रवचन दिले नाही. त्यांनी लोकांना कधी ध्यान-धारणा देखील शिकवली नाही. त्यांना परमेश्वराची भक्ती, साधना, ईश्वरावरील प्रेम म्हणजे फक्त हास्य असेच वाटायचे. आपण जेव्हा हसत असतो तेव्हा परमेश्वराजवळ जाण्याची वाट असते. ही त्यांची धारणा होती. हसण्याशिवाय परमेश्वराची भक्ती असू शकत नाही. ही त्यांची धारणा दिवसेंदिवस पक्की होत चालली होती.

हे भिक्षू लोकांना भेटायचे मात्र भेटले तरी फक्त हसत राहायचे. त्यांना फक्त हसणेच ठाऊक होते. त्यांचे हे वागणे लोकांना सुरुवातीला अत्यंत विचित्र वाटायचे. लोक त्यांच्याकडे पाहून अधिक चिंताक्रात व्हायचे. का बरं हसत असतील? असं त्यांना वाटायचं. अनेकदा लोकांना हे का हसतात? या बद्दल त्यांना प्रश्न विचारावे असे मनात यायचे पण लोकांना भीती वाटायची. कोणी धाडस करत नसायचे. मग कोणी तरी धाडस करून विचारले की, ''तुम्ही का हसता?'' ते शांतपणे ऐकून घ्यायचे आणि पुन्हा हसायचे मात्र त्यांच्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे नाहीत. त्यामुळे लोकांना काहीच कळत नव्हते... पण हे भिक्षू हसत आहेत, हे पाहिल्यावर लोकही त्यांच्यासोबत हसू लागले. भिक्षू तर फक्त हसत राहायचे. हळूहळू गावोगाव लोकांना जाणवले की, त्यांच्या हसण्याने आपल्या अवतीभोवतीचे वातावरण बदलते आहे. आपल्या आयुष्यातील दुःखाची लहरही कमी होते आहे. हे लोक जिथे जातात तिथे आनंद पसरायला सुरूवात होते. तेथील वातावरणात मोठा बदल होतो. लोक दुःखी असतील तर दुःखातही हलकेपणा येऊ लागला. आता लोकांना देखील हास्यामुळे आनंद मिळू लागला होता. लोकांना अनेकदा प्रश्न पडू लागला की, या लोकांच्या आयुष्यात असा एकही क्षण नसेल का? हे लोक जीवनात दुःखी असतील... लोकांच्या मनातच प्रश्न निर्माण झाले की, ही लोक मृत्युच्या वेळी नेमके काय बरं करत असतील? असा प्रश्न लोकांना पडायचा.

अखेर एक दिवस त्या तीन भिक्षूंपैकी एक भिक्षू मरण पावला. साधारण आपला नातेवाईक, आपला मित्र, स्नेही, आपल्या सहवासातील कोणी जरी मरण पावले तरी आपल्याला दुःख होते. आपल्या जातीचा, धर्माचा, पंथाचा, भाषेचा माणूस नसला आणि केवळ परिचय असला तरी त्यांच्या मृत्युने दुःख होते आणि हास्य मावळते. अगदी माणसं जेव्हा अंतिम निरोप द्यायला जातात तेव्हा देखील स्मशानभूमीत मनातील एखाद्या विचाराने हास्य आले तरी माणसं ते हास्य दाबून ठेवतात कारण ती हास्याची जागा नाही. येथे तर तीन भिक्षू जीवनभर सोबत राहत होते. फार थोडे क्षण ते एकमेकांपासून दूर राहिले असतील. त्यामुळे यांच्यापैकी आता एक जण मृत्यू पावला आहे म्हटल्यावर उरलेले दोघे रडतील, असे लोकांना वाटू लागले होते. येथे देखील लोकांच्या मनात जे होते, त्याच्या उलट झाले.

आता आपला एक सहकारी मृत्यू पावला आहे, तेव्हा ही माणसं आणखी जोराजोरात हसू लागली होती. त्यांचे हे उंचावलेले हास्य पाहिल्यावर लोकांनी विचारले : ''तुमचा मित्र मरण पावला आहे आणि तरी तुम्ही हसता आहात?'' लोकांचे हे प्रश्न ऐकल्यावर भिक्षूंनी लोकांना सांगितले : ''आम्ही आयुष्यभर हसल आलो आहोत. कोणत्याही व्यक्तिच्या जीवनात मृत्यू हा शेवट नाही हे लक्षात घ्या. आणखी एक हास्याचा प्रसंग आहे तुमच्या आयुष्यात. खरे तर आज आमच्या मित्राचे निधन झाले आहे. तुमच्या दृष्टीने त्याचा मृत्यू झाला आहे पण आम्ही असे मानतो की, आमचा एक मित्र आता मुक्त झाला आहे. त्याच्या स्मरणार्थ आम्ही हसतो आहोत.'' प्रथमच ते भिक्षू म्हणाले होते, ''लोकहो... हसू म्हणजे ध्यान! आनंद आणि हसू हेच खरे ध्यानाचे मार्ग आहेत. आपण ज्याला ध्याय म्हणतो, त्या मार्गाने सर्व साध्य होते का? त्याचे उत्तर 'नाही' असेच येते. हसत हसत जीवन जगण्याचा प्रयत्न केला तर हे सक्रीय ध्यान जीवनाला आनंदाची वाट दाखवेल यात शंका नाही. मानवी जीवनातील अंतिम सत्य काय असेल तर तो आहे मृत्यू. आपण कितीही आणि वेगवेगळ्या वाटांनी प्रवास केला तरी मृत्युला चुकवता येत नाही. मृत्यू हेच जीवनाचे अंतिम सत्य आहे. त्यामुळे त्याचा स्वीकार केला की, मृत्युची भीती संपुष्टात येते. भीती संपली की दुःख आपोआप संपते. त्यामुळे स्वीकृती जीवनाचे आनंदाचे क्षण वाढवत राहते. प्रत्येक माणसाने मृत्युचा स्वीकार करण्याची आवश्यकता आहे. माणसाचा मृत्यू म्हणजे दुःखाचा प्रसंग नाही तर तो मानवी जीवनातील मुक्तीचा क्षण आहे. जीवनातील सर्व दुःखहरण होण्याचा तो एकमेव राजमार्ग आहे. जीवनाचा आज असलेल्या उत्सवासारखाच मृत्युचा महोत्सव व्हायला हवा. आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षणाला हलकेपणाने आणि आनंदाने जगण्याची गरज आहे. आपण मात्र जीवनात आनंदाचे क्षण जरी आले, तरी त्याकडे दुर्लक्ष करत पुन्हा पुन्हा दुःख अनुभवत असतो. खरं तर असे आनंदाने जगणे हिच आध्यात्मिकता आहे.

आपण जीवनाला फार गंभीरतेने घेतो पण हसू हेच खरे औषध आहे. ध्यान म्हणजे गंभीरतेने बसणे नाही; ते आनंदाने जगणे आहे. मृत्युला देखील आपण उत्सवात बदलू शकतो. त्यामुळे फक्त आपली दृष्टी आणि दृष्टिकोनात बदल होण्याची गरज आहे. जीवनभर निराशेच्या छायेत आणि दुःखात जगणे म्हणजे एक प्रकारचा मृत्युच आहे. त्यामुळे क्षणोक्षणी मृत्युला सामोरे जातच असतो... त्यातून मुक्ती हवी असेल तर आपण हसत हसत जीवनाला सामोरे जाण्याची गरज आहे.




## पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये

- महाराष्ट्रातील विविध भागांत प्रयोगशील उपक्रम राबवणाऱ्या शिक्षकांच्या कथा.
- शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी मार्गदर्शक.
- शिक्षणप्रेमी, शिक्षक, पालक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी एक अनिवार्य वाचन.
- शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा लेखाजोखा.

महाराष्ट्राला शिक्षकांची एक मोठी परंपरा लाभलेली आहे. खेड्यापाड्यांमध्ये अनेक शिक्षक आपल्या नावीन्यपूर्ण योगदानाने शिक्षण प्रक्रियेत योगदान देत आहेत. २०२५ या वर्षात दैनिक ॲग्रोवन वृत्तपत्राकडून पुन्हा एकदा मला लेख लिहिण्याची संधी मिळाली. ही संधी महाराष्ट्रातील उपक्रमशील शिक्षकांच्या कार्याचा परिचय करून देण्यासाठी कारणी लावावी असे माझ्या मनाने घेतले. मी स्वतः शिक्षक म्हणून तीन दशकांहून अधिक काळ काम केलेले असल्याने अनेक चांगल्या शिक्षकांबद्दल मला पाहून, वाचून माहिती होते. 'चांगली माणसे मोजण्यासाठी हाताला हजार बोटे असावीत' असे भालचंद्र नेमाडे म्हणतात ते खरेच आहे. शोधायला गेले की आपल्या अवतीभोवती उत्तमोत्तम कार्य करणारे अनेक शिक्षक नजरेत येऊ लागतात. त्यामुळे अखेरचा लेख लिहितानाही आपण तो शिक्षकांविषयीच लिहावा असे मनात आले आणि त्या शिक्षकाचा शोधही मला माझ्या जवळच लागला.

– डॉ. कैलास दौंड

च प र क चपराक प्र का श न www.chaprak.com

संपर्क : ७०५७२९२०९२
info@chaprak.com

साप्ताहिक चपराक www.chaprak.com

RNI No. MAHMAR/2011/35979



'चपराक' आणि 'लाडोबा' प्रकाशनची पुस्तके घरपोच मागविण्यासाठी हा क्यूआरकोड स्कॅन करा

संपर्क : ७०५७२९२०९२


# 'बोले तैसा चाले...'

भगवान दातार

**पुणे** : 'बोले तैसा चाले' हे हल्लीच्या राजकारणात खूपच दुर्मीळ झालं आहे. सध्याचे नेते अडखळत बोलतात आणि चालताततही अडखळतातच. हे सोडून द्या पण आपण दिलेल्या शब्दाला जागून तो पूर्ण करण्याची कर्तबगारी फार कमी नेते दाखवतात. सहकारनगरमधून निवडून आलेली आणि वयाने सर्वात लहान नगरसेविका असलेली सई थोपटे हिने मात्र आपला शब्द पाळून एक सुखद धक्का दिला आहे.

सहकारनगरमधल्या स्वामी समर्थ गल्लीचा रस्त्यालगतचा कोपरा कालपर्यंत कचऱ्याचे भांडारच होते. या परिसरातल्या अनेक महिला चोरपावलांनी येऊन आपल्या घरातल्या ओल्या कचऱ्याच्या पिशव्या या कोपऱ्यावर बिनदिक्कत फेकत असत. आजूबाजूच्या दुकानदारांनाही आपला कचरा फेकण्यास हीच जागा सापडत असे. बाजूच्या दारुच्या दुकानदाराला आणि त्याच्या गिऱ्हाइकांना तर हा कोपरा म्हणजे जणू पर्वणीच. समोर ५० मीटर अंतरावर शाळा असलेल्या या रस्त्यावर मुलामुलींची ये-जा नेहमीचीच पण तरीही या कोपऱ्यावर कायम दारुड्यांची गर्दी. तिकडे ना शासनाचं लक्ष ना पोलिसांचं. स्वामी समर्थांच्या पवित्र मंदिराकडे जाणाऱ्या या रस्त्यावरचा हा कोपरा म्हणजे उकीरडाच. इथल्या नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी केल्या पण व्यर्थ.

यावेळच्या निवडणुकीत सई निवडून आली आणि या भागातील रहिवाशांच्या मनात एक आस निर्माण झाली. काही तरी करुन दाखविण्याची उमेद असलेली, स्वच्छ प्रतिमा असलेली ही मुलगी नव्या आशा जागविणारी होती. इथल्या नागरिकांनी या कोपऱ्याची कहाणी तिच्या कानावर घातली. 'थोडे दिवस द्या, मी नक्की काही तरी करते' असं आश्वासन तिने दिलं. तक्रार करणारे सवयीने ते विसरुनही गेले पण सई विसरली नाही. अधिकाऱ्यांशी चर्चा करुन तिने या कोपऱ्याच्या सुशोभिकरणाची योजना तयार केली आणि आश्चर्य म्हणजे ती प्रत्यक्षात उतरवली. तिने या कोपऱ्याचं विद्रुप चित्र पार पलटून टाकलं. तिथल्या भिंतीला आकर्षक रंग दिला. टायर आणि झाडाचे बुंधे वापरुन केलेलं आकर्षक डिझाईन तिथे उभं केलं. त्या कोपऱ्याचं रुप पालटलं.



या सुशोभिकरणाचं उद्घाटन झालं तेव्हा तिथल्या रहिवाशांनी पुष्पगुच्छ देऊन तिचा सत्कार केला पण सईने एकटीने त्याचं श्रेय न घेता वॉर्डाच्या अधिकाऱ्यांनाही त्यात सामावून घेतलं. यावेळी रहिवाशांवरोबरच श्री. विजय बिबवे, गौतम साळवे, पप्पु खंदारे हे वॉर्डाचे अधिकारी व पालिकेचे काही कर्मचारी उपस्थित होते. तिथं जमलेल्या सर्वांनीच टाळ्यांच्या कडकडाटात तिच्या या कर्तव्यपूर्तीचं स्वागत केलं.

सई, तुझे आभार आणि मनापासून कौतुकही.



# छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्याअर्थी युगपुरुष : बलकवडे

**पुणे** : हजार वर्षांच्या गुलामगिराच्या बेड्या तोडून हिंदवी स्वराज्य उभं करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने युगपुरुष होते, असे उद्गार ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांनी काढले. रा. स्व. संघाच्या अरण्येश्वर प्रभात शाखेच्या 'हिंदु साम्राज्य दिन' उत्सवात ते बोलत होते. संघचालक अविनाश धोमकर व ज्येष्ठ पत्रकार आणि दैनिक पुढारीचे कार्यकारी संपादक सुनील माळी यावेळी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन हा संघातर्फे हिंदू साम्राज्य दिन म्हणून साजरा केला जातो. या उत्सवात बोलताना श्री. बलकवडे यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्रातील घटनांचा उल्लेख करत त्यामागील सूत्र सांगितले. परदेशातील लोक संस्कृती विसरले म्हणून त्या संस्कृती नष्ट झाल्या पण भारतात राज्यकर्त्यांनी व धर्मरक्षकांनी आपल्या प्राचीन संस्कृतीची नाळ सोडली नाही. शिवाजी महाराजांच्या जीवनात प्रभु रामचंद्रांचे चारित्र्य आणि भगवान श्रीकृष्णाची राजनीती होती. त्यामुळे ते यशस्वी झाले असे सांगून श्री. बलकवडे म्हणाले की, गाढवाचा नांगर फिरवलेले पुणे माता जिजाऊ यांनी शिवरायांच्या हातून पुन्हा उभे केले. गाढवाचा नांगर फिरवलेल्या किंवा उद्ध्वस्त झालेल्या शहरातून नवे संपन्न शहर उभे राहण्याचे पुणे हे जगातले एकमेव उदाहरण आहे.

प्रारंभी श्री. माळी यांनी बलकवडे यांचा परिचय करुन दिला. बलकवडे यांनी केलेला अभ्यास म्हणजे एक प्रकारचं तप आहे. या साधनेमुळेच त्यांच्या लिखाणाला एक प्रकारचे वजन प्राप्त झाले आहे असे ते म्हणाले.

सुहास काणे यांनी सूत्रसंचालन केले. भूषण करमरकर यांनी सांघिक गीत सांगितले. जे. डी. कुलकर्णी यांनी वैयक्तिक पद्य म्हटले. शिरीष वनारसे यांनी अमृतवचनाचे व संजीव खळदकर यांनी बोधवाक्याचे वाचन केले.

